## निशाण क्रमांक ५ व ३३ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अन्वये वादींनी दाखल केला असून, प्रतिवादी क्रमांक १ ते ३ यांनी मंगळवेढा मौजे खुपसंगी येथील शेतजमीन गट नं. ३९२/२/ब या मिळकतीमधील वादीच्या सामाईकातील क्षेत्रातील वादीच्या शांततापुर्ण कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करु नये, करिता प्रतिवादी क्रं. १ ते ३ यांचेविरुद्ध तूर्तातूर्त मनाई हुकूम मिळण्याकामी दाखल केला आहे .

## वादीचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे,

२. वादीने प्रस्तुतचा दावा सरस निरस मानाने वाटप करुन मिळणेकरीता, हक्क ज्ञापनाकरीता आणि निरंतर मनाईकरीता दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जाव्दारे वादी कथन करतात की, दावा कलम १अ मधील मिळकतीपैकी ० हे ४७ आर क्षेत्राची मिळकत वादी क्रं. २ हिने तिची आई वादी क्रं. ३ व तिचा सावत्र भाऊ प्रतिवादी क्रं. २ यांच्याकडुन खरेदी घेतली आहे. सदर मिळकतीमध्ये वादी क्रं. २ हिचा नवरा बाळु देवकाते यास महाराष्ट्र शासनामार्फत पंतप्रधान आवास योजनेतुन घरकुल मिळाले आहे. सदरचे घरकुल वादी क्रं. २ हिने तिच्या सामाईकातील क्षेत्रात बांधत आहे. मात्र सदर बांधकामास प्रतिवादी क्रं. १ ते ३ हे हरकत अडथळा करीत

आहेत. तसेच प्रतिवादी क्रं. ३ वादी क्रं. १ व २ यांना दावा कलम १अ मधील मिळकतीत वहिवाट करणेकामी हरकत अडथळा करीत आहे. प्रतिवादी यांच्या सदरच्या कथनांमुळे वादी यांचे अपरिमित नुकसान होत आहे. त्यामुळे प्रस्तुतचा मनाई आदेश प्रतिवादी क्रं. १ ते ३ यांच्या विरुध्द दाखल केला आहे. सदरचे अर्ज नामंजुर झाल्यास वादीचे अपरिमित नुकसान होईल, सकृतदर्शनी दावा वादीच्या बाजुने आहे तसेच न्यायाचा समतोल देखील वादीच्या बाजुने आहे. करीता अर्ज मंजुर करणेत यावा.

**३.** वादीच्या प्रस्तुत अर्जावर प्रतिवादी क्रं. १ ते ३ यांचे म्हणणे मागविणेत आले. प्रतिवादी क्रं. १ ते ३ यांना पुरेशी संधी देवुन देखील त्यांनी वादीच्या प्रस्तुत अर्जास म्हणणे सादर केले नाही. त्यामुळे त्यांच्याविरुध्द प्रस्तुत अर्जास म्हणणे नाही असा आदेश पारीत करुन, प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्रं. १ ते ३ यांच्या म्हणण्याशिवाय चालविणेत आला.

**४.** वादी यांच्या कथनांवरुन व त्यांनी दाखल केलेल्या कागदपत्रावरुन पुढील प्रश्न माझ्या विचारात उपस्थित झाले. सदर प्रश्नावरील माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालील प्रमाणे देत आहे.

| **अ.क्र.** | **प्रश्न** | **उत्तर** |
|---|---|---|
| १. | वादींना सकृत दर्शनी केस आहे ? | **होय** |

| | | |
|---|---|---|
| २. | न्यायाचा समतोल वादींच्या बाजूने झुकतो का? | **होय** |
| ३. | अर्ज नाकारलेस वादींचे अपरिमित नुकसान होणार आहे का? | **होय** |
| ४. | अंतिम आदेश काय? | **अर्ज मंजूर करण्यात येत आहे.** |

## कारणमिमांसा

**५.** सदर वाद प्रश्नामध्ये प्रथमतः वादीने तीन महत्त्वाची सुवर्ण तत्वे म्हणजेच त्याच्या बाजूने सकृत दर्शनी खटला आहे का? न्यायाचा समतोल हा त्याच्या बाजूने आहे का? या बाबी सिध्द केल्या आहेत ? हे पाहणे जरुरीचे आहे.

**मुद्दा क्रमांक १ करीताः–**

**६.** मुद्दा क्रमांक १ हा वादींना सकृत दर्शनी केस आहे का? या संदर्भातील आहे. वादीने प्रस्तुतचा दावा सरस निरस मानाने वाटप होवुन, हक्क ज्ञापणाकरीता आणि निरंतर मनाईकरीता दाखल केला आहे. वादींनी प्रस्तुत अर्जाव्दारे प्रतिवादी क्रं. १ ते ३ यांनी वादींच्या दावा कलम १अ मिळकतीमधील सामाईक क्षेत्रास हरकत अडथळा करु नये याकरीता प्रतिवादी क्रं. १ ते ३ यांच्या विरुध्द प्रस्तुतचा दावा अंतिम निकाल होईपावेतो मनाई आदेशाची मागणी केली आहे. त्यामुळे वादीस

सकृतदर्शनी केस आहे हे सिध्द करण्याकरीता वादींनी खालील बाबीं सकृत दर्शनी त्याच्या बाजुने आहेत हे दर्शवुन देणे आवश्यक आहे.

अ. दावा मिळकत कलम १अ ही मिळकत वादी व प्रतिवादी क्रं. १ ते ३ यांच्या वडिलार्जीत एकत्र हिंदु कुटुंबाची मिळकत आहे का?

ब. दावा कलम १अ मधील ० हे ४७ आर क्षेत्र वादींनी खरेदी केली आहे का?

क. प्रतिवादी क्रं. १ ते ३ वादीच्या दावा कलम १अ मिळकतीमधील वादीच्या सामाईक क्षेत्रास हरकत अडथळा करीत आहेत का?

**७.** सदर मुद्दयांच्या अनुषंगाने वादी तर्फे विधिज्ञांनी युक्तीवाद केला की, दावा कलम १अ क्षेत्र १ हे ६१ आर पैकी ० हे ४७ आरचे क्षेत्र वादी क्रं. २ हिने तिची आई वादी क्रं. १ व सावत्र भाऊ प्रतिवादी क्रं. २ यांच्याकडुन खरेदी घेतली आहे. तसेच इतर क्षेत्रामध्ये वादींची सामाईक कब्जेवहिवाट आहे. वादी क्रं. २ हिच्या नव–यास महाराष्ट्र शासनामार्फत पंतप्रधान आवास योजनेतुन घरकुल मिळालेले आहे. सदर घरकुलाचे बांधकाम जोता या लेव्हल पर्यंत आलेले आहे. मात्र सदर बांधकामास प्रतिवादी क्रं. १ ते ३ हे हरकत अडथळा करीत आहेत.

**८.** वादीतर्फे विधिज्ञांच्या युक्तीवादाच्या आणि वादीच्या अर्जातील कथनांच्या अनुषंगाने अभिलेखावरील निशाणी क्रं. ४ कडे अ.क्रं. १ कडील दावा मिळकतीच्या ७/१२ उता–याचे अवलोकन केले असता, दावा मिळकतीच्या ७/१२

पत्रकी नंदाबाई बाळु देवकाते व इतर सह हिस्सेदार यांच्या नावांची नोंद फेरफार क्रमांक ३७१२ अन्वये झाल्याचे दिसुन येते. तसेच निशाणी क्रं. ४ कडे अ.क्रं. ९ कडील खरेदीदस्ताचे अवलोकन केले असता, दावा कलम १अ मधील एकुण क्षेत्रापैकी ० हे ४७ आर क्षेत्र वादी क्रं. १ हिने प्रतिवादी क्रं. २ दिनांक ०१/१२/२००४ रोजी वादी क्रं. २ यांच्या नावे खरेदी दिल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. यावरुन वादी क्रं. २ ही दावा कलम १अ या मिळकतीचे हिस्सेदार असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत आहे.

९. वादी तर्फे विधिज्ञांनी निशाणी क्रं. ३६ कडे अ.क्रं. १ व २ कडे गटविकास अधिकारी पंचायत समिती, मंगळवेढा यांनी बाळु देवकते यांना घरकुल संदर्भात दिलेले पत्र अभिलेख सदरी दाखल केले आहे. सदर पत्राचे अवलोकन केले असता, गट विकास अधिकारी पंचायत समिती, मंगळवेढा यांनी बाळु देवकते यांना घरकुलाचे बांधकाम तातडीने पुर्ण करणेसंदर्भात निर्देशित केल्याचे दिसुन येते. सदर पत्रामध्ये घरकुल कोणत्या मिळकतीमध्ये बांधले जात आहे याबाबतचा उल्लेख पत्रामध्ये दिसुन येत नाही. मात्र सदरचा उल्लेख वादीने त्यांच्या वादपत्रामध्ये शपथेवर केल्याचे दिसुन येत आहे. तसेच सदरचे कथन प्रतिवादी यांनी नाकारलेले नाही. यावरुन वादी दावा मिळकत कलम १अ मध्ये बांधकाम करीत असल्याचे प्रथम दर्शनी दिसुन येत आहे.

**१०.** वादी कथन करतात की, वर नमुद घरकुलाच्या बांधकामास प्रतिवादी क्रं. १ ते ३ हे हरकत अडथळा करीत आहेत. सदरचे कथन प्रतिवादी यांनी नाकारलेले नाही. त्यामुळे सदरचे कथन आहे तस ग्राहय धरणे न्यायोचित होईल. यावरुन प्रतिवादी क्रं. १ ते ३ वादीच्या दावा कलम १अ मधील घरकुलाच्या बांधकामास हरकत अडथळा करीत असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत आहे.

**११.** सबब वर नमुद वादीचे वादपत्र, प्रस्तुतचा अर्ज, वादी तर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद, तसेच अभिलेखावर सादर केलेली कागदपत्रे यांचे अवलोकन केले असता, वादी क्रं. २ हिने वादी क्रं. १ व प्रतिवादी क्रं.२ यांच्याकडुन दावा कलम १अ मधील एकुण क्षेत्रापैकी ० हे ४७ आर चे क्षेत्र खरेदी केले असुन, सदर मिळकतीमध्ये वादी क्रं. २ चे पती घरकुलाचे बांधकाम करीत आहेत आणि सदर बांधकामास आणि दावा कलम १अ मधील वादीच्या सामाईक क्षेत्रास प्रतिवादी क्रं. १ ते ३ हरकत अडथळा करीत असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत आहे. करीता मुद्दा क्रं. १ चा निष्कर्ष मी होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.२ व ३ करिताः–</u>**

**१२.** मुद्दा क्रं. २ व ३ हे वादीच्या बाजुने न्यायाचा समतोल आहे का? तसेच, प्रस्तुतचा अर्ज नामंजुर केल्यास वादींचे अपरिमित नुकसान होणार आहे का?

या संदर्भातील आहे. सदरचे दोन्ही मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्या कारणास्तव एकत्रीतपणे चर्चीले आहेत.

**१३.** मुद्दा क्रमांक १ मधील निष्कर्षाचे अवलोकन केले असता, वादींना सकृतदर्शनी केस असल्याचे सिध्द झाले आहे. त्यामधील निष्कर्षाचा विचार करता न्यायाचा समतोल हा वादींच्या बाजुने असल्याने दिसुन येत आहे. वादी तर्फे विधिज्ञांनी प्रस्तुतचा अर्ज नामंजुर झाल्यास वादींच्या नुकसानी संदर्भात युक्तीवाद केला की, दावा कलम १अ मधील ० हे ४७ आर चे क्षेत्र वादीने खरेदी केली आहे. वादी सदर मिळकतीमध्ये घराचे बांधकाम करीत आहे. गट विकास अधिकारी मंगळवेढा यांनी घरकुलाची बांधकाम तातडीने पुर्ण करणेबाबत निर्देशित केले आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्रं. १ ते ३ यांनी बांधकामास हरकत अडथळा केल्यास घरकुलाचे बांधकाम मुदतीत पुर्ण होणार नाही. तसे झाल्यास वादीस मंजुर झालेल्या बांधकामाचा निधी परत जाईल. त्यामुळे वादीचे अपरिमित नुकसान होईल तसेच दावा मिळकतीमध्ये सामाईक कब्जेवहिवाट करण्याचा हक्क वादीस आहे. सदर हक्कास प्रतिवादी हरकत अडथळा करुन वादीच्या कायदेशीर हक्कान्वये गदा आणीत आहेत. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजुर केल्यास वादींच्या तुलनेत प्रतिवादींचे नुकसान जास्त होईल असे सकृतदर्शनी दिसुन येत नाही. त्यामुळे मुद्दा क्रमांक २ व ३ चा निष्कर्ष मी होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.४ करिताः–</u>**

**१४.** वर नमुद केल्याप्रमाणे तात्पुरता मनाई हुकूम मिळण्यासाठी आवश्यक असलेल्या बाबी वादींनी सिध्द केल्याने त्याअनुषंगाने वादी मनाई हुकूम मिळण्यास पात्र आहेत. करीता मुद्दा क्र. ४ चा निष्कषार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. निशाणी क्रं. ५ व ३३ कडील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रस्तुत आदेशान्वये प्रतिवादी क्रं. १ ते ३ यांना निर्देशित करणेत येते की, प्रस्तुत दाव्याचा अंतिम निकाल लागेपावेतो प्रस्तुत प्रतिवादींनी दावा कलम १अ मधील मिळकतीत वादीचे समाईकातील क्षेत्रातील शांततापुर्ण कब्जे वहिवाटीस व बांधकामास हरकत अडथळा केला जाईल, व्यत्यय आणले जाईल, नुकसान केले जाईल, हुसकावुन लावले जाईल, प्रतिबंध केला जाईल, मशागत करणेस व्यत्यय व अडथळा आणला जाईल अशी कोणतीही कृत्ये प्रतिवादी क्रं. १ ते ३ यांनी स्वतः अगर इतरांमार्फत हरकत अडथळा करु नये अशी तुर्तातुर्त ताकीद देणेत येते.

Digitally signed by RITESH MAHAVIR DEVARSHI
Date: 2023.08.17 15:38:45 +0530

ठिकाण – मंगळवेढा **(आर.एम. देवर्षी)**

दि.२५/०७/२०२३ २रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, मंगळवेढा